उत्कृष्ट क्वालिटी
साबुदाणा ५५ रु.किलो
शेंगदाणे १०० रु.किलो
सेंद्रिय गुळ ५० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

Post Regd.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१८७ ■ गुरुवार १७ एप्रिल २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

# मुस्लिमांना हिंदू धर्माच्या संस्थेवर संधी मिळेल का? सर्वोच्च न्यायालयाचा केंद्र सरकारला खडा सवाल

## वक्फ कायद्याविरोधात दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी



**नवी दिल्ली, दि.१६- वक्फ (सुधारणा) कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. वक्फ कायद्यात केलेल्या अनेक तरतुदींबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला प्रश्न विचारले. वक्फ कायद्यात सुधारणा करताना वक्फ बोर्डावर बिगरमुस्लीम सदस्यांची नेमणूक करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. आता हिंदू धर्माच्या संस्थांवर मुस्लीम व्यक्तीची नेमणूक करणार का?, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारला आहे.**

सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायाधीश संजय कुमार आणि न्यायाधीश केव्ही विश्वनाश यांच्या खंडपीठासमोर याचिकेची सुनावणी सुरू आहे. वक्फ कायद्याविरोधात ७० हून अधिक याचिका दाखल झाल्या असून ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु सिंघवी यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली. तर केंद्र सरकारच्या वतीने महाअधिवक्ता तुषार मेहता युक्तिवाद करत होते. वक्फ बोर्डावर बिगर मुस्लीम सदस्याची नेमणूक करण्याबाबत कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु सिंघवी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने तुषार मेहता यांना थेट प्रश्न विचारला. यापुढे हिंदू धर्माच्या संस्थांवर मुस्लीम व्यक्तीला घेतले जाणार का? सरकारची यावर काय भूमिका आहे? असा प्रश्न खंडपीठाने विचारला.

वक्फ मालमत्तेचे वाद सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचे अधिकार नव्या कायद्याद्वारे देण्यात आले आहेत. यावरही सरन्यायाधिशांनी प्रश्नचिन्ह उपस्थित (पान ४ वर)

## सरन्यायाधीश पदासाठी गवईंची शिफारस

नवी दिल्ली, दि.१६-भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी बुधवारी केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे न्यायमूर्ती बी.आर गवई यांची पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली. दहा नोव्हेंबर रोजी निवृत्त झालेले माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या जागी न्यायमूर्ती खन्ना यांची अकरा नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली. आता बी. आर. गवई यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिले आहे. खन्ना हे सहा महिन्यांच्या अल्प कालावधीनंतर १३ मे २०२५ रोजी निवृत्त होणार आहेत. परंपरेनुसार, विद्यमान सरन्यायाधीश त्यांचा उत्तराधिकारी म्हणून सर्वात वरिष्ठ न्यायाधीशाची शिफारस करतात. (पान ४ वर)



## शहादा शहरातून जाणाऱ्या बसेसमुळे वाहतुकीची कोंडी त्वरित उपाययोजना करण्याची शहरवासियांची मागणी

**शहादा, दि.१६ (का.प्र.)- महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेससह चारचाकी वाहने शहरातील जुना प्रकाशा रोड कुकडेलमार्गे येजा करत असल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. बसस्थानक ते नगर पालिका चौकात सातत्याने वाहतुकीची कोंडी होत असून प्रशासनाने दखल घेऊन त्वरित उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.**

तालुक्यातील डामरखेडा येथील पूल कमकुवत झाल्यामुळे तसेच पाडळदा चौफुली नजिकच्या पूलास तडे गेल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या बसेससह चारचाकी वाहने शहरातील जुना प्रकाशा रोड कुकडेलमार्गे येजा करत आहेत.या रस्त्यावरील (पान ४ वर)

## घरफोडीच्या गुन्ह्यातील साठ हजारांचे दागिने केले जप्त मांडळ शिवारातील घटना; शिरपूर पोलिसांची कारवाई

**शिरपूर दि.१६ (का.प्र.) - शहराजवळ मांडळ शिवारात केलेल्या घरफोडीतील संशयिताला अटक करुन शहर पोलिसांनी साठ हजार ४५६ रुपयांचे दागिने परत मिळवण्यात यश मिळवले.**



उपनिरीक्षक हेमंत खैरनार १२ एप्रिलला शहरात पेट्रोलिंग करीत असतांना सायंकाळी अरूणावती नदीकाठावर शनी मंदीर परिसरात अंधारात संशयित उभा दिसला. पोलिसांना पाहून त्याने पळण्याचा प्रयत्न केला. त्याचा पाठलाग करुन पोलिसांनी पकडले. मुकेश भुवनसिंग वास्कले (वय २२, रा.वाक्या ता.सेंधवा, मध्य प्रदेश) असे संशयिताचे नाव आहे. पोलिस ठाण्यात आणून कसून चौकशी केली असता त्याने शहराजवळ मांडळ शिवारात घरफोडी केल्याची कबुली दिली. नरेंद्र सीताराम निकम (वय ६० रा. कृष्णा व्हॅली, मांडळ ता. शिरपूर) यांच्याकडे ही घरफोडी झाली होती. ते पाच ते सहा मार्चदरम्यान लग्नासाठी सहकुटूंब बाहेरगावी गेले होते. घर कुलूपबंद असल्याची संधी साधून संशयितांनी घरफोडी करीत सोनेचांदीचे दागिने मिळून ७९ हजार ६७३ रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेला होता.

पोलिसांनी (पान ४ वर)

## कुमार मंगलम बिर्लांना लता मंगेशकर पुरस्कार

मुंबई, दि.१६- यावर्षीच्या मंगेशकर पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून उद्योजक आणि पद्मविभूषण कुमार मंगलम बिर्ला यांना लता मंगेशकर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर संगीत, नाटक, साहित्यासह सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांना दीनानाथ मंगेशकर पुरस्कार पुरस्कार जाहीर झाला आहे. चोवीस एप्रिलला सरसंघचालक मोहन भागवतांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. ज्येष्ठ लेखक श्रीपाल सबनिस यांना साहित्य क्षेत्राचा तर 'असेन मी नसेन मी' या नाटकाला नाट्य श्रेत्रातील पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी आरंभ सोसायटी (पान ४ वर)

## सोयाबीन कट्टा चोरीचा तपास अन् दोन गुन्हे उघडकीस नवापूर पोलिसांची कामगिरी; दोघांना अटक करण्यात यश

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी) - गोडाऊनमधील सोयाबीन कट्ट्याच्या चोरीच्या तपासातून चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. या गुन्ह्यातील चार संशयीत असून दोघांना अटक करण्यात आली आहे. तर दोन फरार आहे. संशयीतांकडून सोयाबीन व तुरडाळसह एक लाख ८१ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

नवापूर तालुक्यातील विसरवाडी पोलीस ठाणे हद्दीतील खांडबारा येथील फिर्यादी विजयराज गिमारामजी माळी यांच्या तलावीपाडा गावाजवळ असलेल्या शासकीय आश्रम शाळेच्या समोरील गोडाऊन मधून अज्ञात इसमांनी सोयाबीनचे कट्टे चोरुन नेले. विसरवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास सुरु होता. नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा रेकॉर्डवरील आरोपी नामे सुर्या ऊर्फ सुरेश रमेश गावित (रा. सावरट, ता. नवापुर) व त्याचा मित्र आकाश जयसिंग वळवी (रा. डोकारे ता.नवापुर) यांनी त्यांचे साथीदारांसमवेत केला असून त्यापैकी आकाश जयसिंग वळवी हा नवापुर गावात होन्डा शोरुमला येणार असल्याची माहिती मिळालेवरुन पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, एस यांच्या मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला कारवाईसाठी रवाना केले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून इसम नामे आकाश वळवी याचा नवापुर येथील होन्डा शोरुमजवळ शोध सुरु असतांनाच तो मिळून आला. त्यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव आकाश जयसिंग वळवी (वय २८ वर्षे, रा.डोकारे, ता.नवापुर जि. (पान ४ वर)

## अंजनविहिरे गावात दुचाकीला अपघात

धुळे, दि.१६- शिंदखेडा तालुक्यातील अंजनविहिरे गावात पुढे चालणाऱ्या दुचाकीला मागुन भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. विश्वनाथ श्रावण बनगर यांनी दि.१५ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, शिंदखेडा तालुक्यातील खर्दे ते अंजनविहिरे शिवारातील रस्त्याने जात असतांना संदीप दिलीप पदमर रा.अंजनविहिरे ता.शिंदखेडा यांनी भरधाव वेगाने दुचाकी क्र.एमएच १८/सीए-७३३४ आणून मागून धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात विश्वनाथ बनगर हे जखमी झाले. याप्रकरणी सदोंडाईचा पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.




## साक्री तालुका माध्य.शिक्षक पतपेढी पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

**साक्री, दि.१६ (प्रतिनिधी)- धुळे जिल्ह्यातील साक्री तालुका माध्यमिक शिक्षकांची पतपेढी साक्रीच्या २०२३ ते २७ कार्यकाळातील तिसऱ्या वर्षीच्या निवडणूक प्रक्रियेत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जगदीश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष सभा काल साक्रीत संपन्न झाली. या विशेष वार्षिक सभेत माध्यमिक शिक्षकांच्या पतपेढीच्या चेअरमन व व्हा. चेअरमन या दोन्ही पदांसाठी लोकशाही पद्धतीने बिनविरोध निवड करण्यात आली.**

पतपेढीच्या चेअरमनपदी घोडदे येथील मुख्याध्यापक सुनील आनंदराव क्षीरसागर यांची बिनविरोध निवड झाली. तर व्हा. चेअरमन पदी पिंपळनेर कन्या शाळेचे जेष्ठ शिक्षक कुणाल गांगुर्डे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी पिंपळनेर येथील कर्मवीर आ.मा.पाटील पब्लिक एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेंद्र मराठे व सेवानिवृत्त प्राचार्य ए.बी. मराठे व त्यांचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. निवडणूक प्रकियेत सहाय्यक निबंधक आर.सी. चौधरी यांनी काम केले. तर डी. वी. सूर्यवंशी यांनी अनुमोदन केले आणि अनिल (पान ४ वर)

## बांधकामाच्या कारणावरून एकास तिघांची मारहाण

धुळे, दि.१६- साक्री तालुक्यतील भामेर गावात बांधकामाच्या कारणावरून एकास तिघांनी शिवीगाळ करत लोखंडी सळईने मारहाण केल्याची घटना घडली आहे. संदीप अशोक निकुंभ यांनी दि.१५ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, भामेर येथे विकास अशोक गवळे, अशोक नामदेव गवळे, दिपाली विकास गवळे या तिघांनी दि. ४ एप्रिल रोजी दुपारी चार वाजता संगनमताने एकत्र येवून शिवीगाळ करत मारहाण केली. यावेळी अशोक गवळे यांनी लोखंडी सळईने संदीप निकुंभ यांच्या डोक्यात मारून जखमी केले. या प्रकरणी तिघांविरोधात निजामपूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निलगिरीचे झाड कापण्यातून एकाचा खून; जमानातील घटना

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी) - सामाईक शेतातील निलगीरी-चे झाड कापण्याच्या कारणातून गळा व गुप्तांगावर हाताबुक्क्यांनी मारहाण करीत एकाला जीवेठार मारल्याची घटना जमाना (चोपडापाडा) येथे घडली. तसेच मयताच्या कुटुंबियांनाही जीवेठार मारण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी चार जणांविरुद्ध मोलगी पोलिस ठाण्यात खुन व खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

अक्कलकुवा तालुक्यातील जमाना (चापडापाडा) येथील शंकर गुलदारसिंग पाडवी व त्यांचे वडील गुलदारसिंग पाडवी हे दोघे पिता-पुत्र शेतातील निलगीरीचे झाड कापत होते. झाड कापण्याच्या कारणातून पृथ्वीसिंग करमसिंग पाडवी, विरसिंग पृथ्वीसिंग पाडवी या दोघांनी हाताबुक्क्यांसह कुऱ्हाडीने मारहाण करीत शंकर पाडवी यांना जखमी करीत जीवेठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच पृथ्वीसिंग करमसिंग पाडवी, वीरसिंग पृथ्वीसिंग पाडवी, दिनेश पृथ्वीसिंग पाडवी, रविदास पृथ्वीसिंग पाडवी या चौघांनी हाताबुक्क्यांसह लाथेने गळा व गुप्तागांवर (पान ४ वर)

## उपनिरीक्षक कासले आत्मसमर्पण करणार

बीड, दि.१६- निलंबित आणि वादग्रस्त पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले स्वतः हून पोलिसांना शरण जाणार आहे. त्याने सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करत ही माहिती आहे. वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची मला ऑफर होती असा खळबळजनक गौप्यस्फोट कासले याने केला होता. त्यानंतर राज्यात मोठी खळबळ उडाली होती. याच दरम्यान बीडच्या शिवाजी नगर पोलिसांत अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हाही दाखल झाला आहे. त्यामुळे कासले याच्या अडचणीत वाढ झाली आहे. हेच लक्षात घेता कासले याने एक पाऊल मागे घेत आता बीड (पान ४ वर)

## सोनगीर सरपंच रंजना मोरे अपात्र नणंदेची तक्रार ठरली निर्णायक

**सोनगीर दि.१६ (प्रतिनिधी) - सरकारी जमिनीवर अतिक्रमण केल्याच्या आरोपावरून सोनगीरच्या सरपंच रंजना शामलाल मोरे यांना धुळे जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्र ठरवले आहे. विशेष म्हणजे, एकाच पंचवार्षिक काळात सोनगीरमध्ये सरपंच अपात्र होण्याची ही दुसरी घटना आहे.**

या कारवाईमागे रंजना मोरे यांच्या नणंद (पतीची बहीण) यांनी त्यांच्या विरोधात केलेली तक्रार कारणीभूत ठरली. ऑक्टोबर २०२३ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत रंजना श्यामलाल मोरे वार्ड क्रमांक एकमधून सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या. त्यानंतर, जानेवारी २०२४ मध्ये त्यांची सरपंचपदी निवड झाली. निवडणूक अर्ज भरताना रंजना मोरे यांनी सादर केलेल्या स्वयंघोषणापत्रात, आपले कोणतेही शासकीय जमिनीवर अतिक्रमण नसल्याचे नमूद केले होते. मात्र, माजी सरपंच रुक्मिणीबाई गोरख ठाकरे यांनी धुळे जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार, सोनगीर ग्रामपंचायतीच्या गाव नमुना नंबर ८ वरील मालमत्ता क्रमांक ४३२३/३ नुसार रंजना मोरे यांच्या नावे ५० बाय ५० फूट (२५०० स्क्वेअर फूट) चे आरसीसी बांधकाम आहे आणि हे बांधकाम अतिक्रमण केलेल्या जागेवर उभारण्यात आले आहे.

या तक्रारी अर्जावर जिल्हाधिकाऱ्यांकडे सुनावणी झाली. दरम्यान, सरपंच रंजना शामलाल मोरे यांनी युक्तिवाद केला की त्यांनी कोणतेही अतिक्रमण केलेले नाही आणि सदर मालमत्ता त्यांची नाही. तसेच, ही नोंद खोडसाडपणे केली गेली आहे, असेही त्यांनी सांगितले. परंतु, धुळे पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालात, रंजना शामलाल मोरे यांच्या नावावरील मालमत्ता क्रमांक ४३२३/३ ही ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याचे नमूद करण्यात आले. या अहवालाच्या आधारावर, जिल्हाधिकारी धुळे यांनी रंजना मोरे यांना ग्राम (पान ३ वर)

## म्हसावदला काँग्रेस पक्षाचा तालुका मेळावा उत्साहात नंदुरबारसाठी कार्यक्षम जिल्हाध्यक्ष देण्याची मागणी

**शहादा, दि.१६ (प्रतिनिधी) -जिल्ह्यात काँग्रेस मजबूत असल्याचेलोकसभानिवडणुकीने दाखवून दिले असतानाही पक्षाकडे काही वर्षापासून पूर्ण वेळ जिल्हाध्यक्ष नसल्याची खंत कार्यकर्त्यांनी बोलून दाखवली. त्यामुळे तळागाळातील निष्ठावान कार्यकर्त्यांची मते जाणून घेऊन पक्षाला आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने सक्रिय व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालणारा आणि पक्ष संघटन अधिक मजबूत करणारा जिल्हाध्यक्षाची नेमणूक लवकर करावी अशी मागणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षाच्या निरीक्षकांसमोर म्हसावद येथे झालेल्या तालुकास्तरीय काँग्रेसच्या आढावा बैठकीत केली.**




म्हसावद येथे पक्ष निरीक्षक ॲड.संदीप पाटील यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ता आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्हा कार्याध्यक्ष सुभाषअण्णा पाटील, ज्येष्ठ नेते राजेंद्र गावित, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुहास नाईक, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.सुरेश नाईक, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विकी पाटील, ड.अशोक पाटील, ओरसिंग पटले, माजी नगरसेवक रियाज कुरेशी, देवा चौधरी, सत्येन वळवी आदी प्रमुख उपस्थित होते.

पक्षनिरीक्षक ॲड.संदीप पाटील म्हणाले इंदिराजिना साथ देणाऱ्या या जिल्ह्यात लवकरच कार्यकर्त्यांना उभारी देणारा आणि पक्षाला नव्या उंचीवर नेणारा कार्यक्षम जिल्हाध्यक्ष दिला जाईल. लोकसभेला यश मिळाले मात्र विधानसभेला अपयश मिळाले तरी कार्यकर्त्यांनी खचून न जाता आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने मतभेद बाजूला ठेवून कार्यकर्त्यांसह नेत्यांनीही सकारात्मक असले पाहिजे. कार्यकर्त्यांच्या ताकदीवर निवडणुका लढविल्या जातात पण त्यासाठी नेत्यांकडून निवडणुकीचे नियोजन करणे महत्वाचे असते वन बूथ- टेन युथ ही संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी पक्षाने आग्रही भूमिका घेतली आहे. राजकारणात चढ उतार येत असले तरी कार्यकर्ते एकसंघ ठेवणे ही प्रत्येक नेत्याची जबाबदारी आहे. सर्वसामान्य कार्यकर्ता पंचायत समिती व जिल्हा परिषदेवर गेला पाहिजे. यासाठी पक्षाने कठोर भूमिका घेतली असून तळागाळात काम करणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यालाच यापुढे तिकीट दिले जाणार असल्याचे स्पष्ट संकेत (पान ४ वर)

## आजी, माजी सैनिकांची तालुकास्तरावर बैठक

धुळे, दि.१६- धुळे जिल्ह्यातील आजी, माजी सैनिकांच्या तालुका पातळीवरील विविध समस्या, अडीअडचणी सोडविण्यासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली, पोलीस निरीक्षक, गट विकास अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ. निलेश पाटील (निवृत्त) यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.राज्यातील आजी, माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तालुकापातळीवर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबत सूचना दिल्या आहे. त्यानुसार (पान ४ वर)

उपसंपादक पाहिजे
वृत्तपत्र क्षेत्रातील अनुभवी, इन डिझाइन मध्ये पेज सेटअप करु शकणारा उपसंपादक पाहिजे. तसेच जिल्हा परिषद बीट प्रतिनिधी व क्राईम रिपोर्टर पाहिजे. समक्ष भेटा! सायंकाळी ६ ते ८
दै.आपला महाराष्ट्र
वीर सावरकर मार्ग, धुळे

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -87,000 रु.+3% GST
सोने- 24 K -95,000 रु.+3% GST
चांदी- 01,0000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनतर्फे महिलांसाठी जनजागृती शिबीर

**शिरपूर, दि.१६- तालुक्यातील सुळे येथे अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशन मार्फत कु.द्वेता भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या विषयावर महिलांसाठी जनजागृती व मार्गदर्शन शिबीर उत्साहात संपन्न झाले.**



स्त्री शिक्षणासाठी पुढाकार घेतलेले थोर समाज सुधारक महात्मा फुले व भारतातील पहिल्या महिला शिक्षिका सौ. सावित्रीबाई फुले तसेच दिन दलितांच्या उद्धारासाठी कार्य करणारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ महिलांसाठी जनजागृती व मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले.

आमदार काशिराम पावरा यावेळी म्हणाले की, पटेल परिवाराची सुकन्या कु. द्वेता पटेल यांनी शिरपूर तालुक्याच्या आदिवासी, दुर्गम भागातील महिला व मुलींसाठी सेवाव्रत स्वीकारले आहे, ही बाब सर्वांसाठी खूपच अभिमानास्पद आहे. संपूर्ण शिरपूर तालुक्यातील महिला, मुली आरोग्यदृष्ट्या सुदृढ रहावे तसेच विविध उपक्रम व शिबिरांच्या माध्यमातून त्यांची प्रगती साधण्यासाठी सातत्याने महत्त्वपूर्ण प्रयतक सुरू आहेत.

अध्यक्षस्थानी आमदार काशिराम दादा पावरा होते. तसेच प्रमुख पाहुणे सौ. गोमतीताई काशिराम पावरा, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ. बेबीताई पावरा, एच.आर.पटेल महिला महाविद्यालय प्राचार्या सौ. शारदा शितोळे, ॲड.सौ.गायत्री राठोड, उपसरपंच (पान ४ वर)

## अंचाडे गावात नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार उत्साहात; मान्यवरांची उपस्थिती

**धुळे, दि.१६- धुळे तालुक्यातील अंचाडे येथे नवनिर्वाचित आमदारांचा नागरी सत्कार सोहळा नुकताच पार पडला. या सत्कार सोहळ्याचे अध्यक्षस्थान माजी आ.राजवर्धन कदमबांडे यांनी भुषविले.**




यावेळी आ. चंद्रकांत रघुवंशी नंदुरबार, आ. अनिल भाईदास पाटील अमळनेर, आ. राघवेंद्र मनोहर भदाणे धुळे ग्रामीण, रावसाहेब गिरासे संचालक मुंबई बाजार समिती यांचा सत्कार करण्यात आला. अंचाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच चुनिलाल चुडामन पाटील यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा झाला. प्रमुख पाहुणे म्हणून बाळासाहेब रावण भदाणे, जयराम आत्माराम पाटील, प्रा.दीलीप बाबुराव पाटील, प्रा.अरविंद जाधव, सुमित पवार, आशुतोष विजय पाटील, गुलाबराव आनंदा पाटील, नाना श्यामजी पाटील, विद्यसाधर अभिमन पाटील, रोहिदास गंगाराम साळुंखे, राजेंद्र शर्मा, वकील पाटील नंदुरबार आदींसह मुकटी, अंचाडे परिसरातील सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच व मान्यवर उपस्थित होते. अंचाडे (पान ४ वर)

# आपला महाराष्ट्र

## पावसाचे आनंददायी वर्तमान पण..!

पूर्वी आपल्या देशात हवामान खाते फार विकसित झालेले नव्हते. काही ठोकताळ्यावरून हवामानाचा अंदाज व्यक्त केले जायचे. प्रसार माध्यमे फारशी नव्हती. रेडिओ शिवाय दुसरा काही पर्याय नव्हता. त्यातल्या त्यात ज्यांच्या घरी रेडिओ होता किंवा ग्रामपंचायत मध्ये होता त्यावरून प्रादेशिक बातमीपत्र अथवा कृषी विषयक कार्यक्रमातून शेतकऱ्यांपर्यंत हवामानाचे अंदाज पोहोचत असत. ते तंतोतंत असतच असे काही नसे. ढगाळ वातावरणाची स्थिती. कमी दाबाचे पट्टे यावरून हवामान खाते अंदाज व्यक्त करीत असे. या परिस्थितीत शेतकऱ्यांपर्यंत काही टक्केवारीतच ही माहिती जात असे. खरे तर शेतकऱ्यांचे स्वत:चेच असे अंदाज असायचे की, त्यावरून केव्हा पाऊस पडणार कसा पडणार याचा अंदाज शेतकरी बांधत असत. उन्हाळा खूप ताप दायक असला, तर यंदा पाऊस चांगला पडणार असे लोक म्हणायचे. आंबे मोहर भरपूर आला, चिंचा भरपूर आल्या तर पाऊस चांगला पडेल असे समजले जायचे. चातक किंवा पावशा पक्षी दिसला म्हणजे पाऊस येणार असे मानले जायचे. कावळ्यांनी घरटी बांधायला सुरुवात केली म्हणजे पावसाचे आगमन लवकर होणार असे अंदाज बांधले जात असत. पाकोळ्या मातीची घरे बांधत असतात. त्या कुठल्या दिशेला आणि कशा पद्धतीने बांधतात यावरून देखील पावसाचे अंदाज बांधले जायचे. मात्र हळूहळू आधुनिक तंत्राचा उगम झाला. आता हे तंत्र इतके शिखरावर पोचले आहे की, अमुक इतके वाजता या भागात इतका पाऊस पडेल असे हवामान विभाग सांगू शकतो. इतके ते प्रगत झाले आहे. अवकाशात सोडलेल्या सॅटेलाईटमुळे आता हवामानाचा अंदाज अचूकपणे प्रसार माध्यमाच्या द्वारे सांगितला जातो. काही खाजगी संस्था आणि खाजगी संशोधक व अभ्यासक देखील या क्षेत्रात पुढे आले आहेत. ते अचूक अंदाज सांगतात. त्यामुळे शेतकऱ्यांना लावणी केव्हा करायची, पीक केव्हा काढायचे, झाकून ठेवायचे की धान्य तयार करून घ्यायचे याबद्दलच्या सूचना देखील हे हवामान तज्ञ देऊ लागलेले आहेत. त्यांची व्याख्याने अलीकडे गावोगावी आयोजित केली जातात. त्या माध्यमातून ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात. यावर्षी किती पाऊस असेल. कोणते पीक घ्यायचे याबद्दलचे देखील मार्गदर्शन त्यांच्या व्याख्यानातून होते. स्कायमेट सारख्या खाजगी हवामान कंपन्या देखील हवामान अंदाज दरवर्षी व्यक्त करतात. त्यानुसार स्कायमेट ने यावर्षी सरासरीपेक्षा १०० टक्क्यांहून अधिक पाऊस पडेल असे भाकित गेल्या आठवड्यात वर्तविले होते. परंतु त्याचा फारसा परिणाम सामान्य जीवनावर झालेला नाही. हवामान खात्यावर अधिक विश्वास असल्यामुळे आणि हवामान खात्याकडे अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध असल्यामुळे सर्व घटकांनी हवामान खात्याकडून येणाऱ्या अंदाजांकडे लक्ष वेधले होते. त्यानुसार भारतीय हवामान विभागाने यंदाच्या पावसाचा अंदाज व्यक्त केला असून यावर्षी सरासरीपेक्षा १०५ टक्के पाऊस पडणार असे जाहीर केले आहे. नैऋत्य मोसमी पावसाचा हा अंदाज आहे. यंदा हिमालयात तुलनेने बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे तसेच हिंद महासागरातील स्थिती सप्टेंबर महिन्यापर्यंत म्हणजेच पावसाळा संपेपर्यंत राहणार असल्याने भरपूर पाऊस पडेल असे हवामान खाते सांगते. शेतकऱ्यांसाठी, तसेच अर्थव्यवस्थेतील सगळ्या घटकांसाठी ही आनंद वार्ता म्हणावी लागेल. ईशान्य भारतात मात्र पावसाचे प्रमाण कमी असेल असे हवामान खात्याचे अंदाज आहेत. गेल्या वर्षी या खात्याने १०६ टक्के पाऊस पडेल असे म्हटले होते. प्रत्यक्षात तो १०८ टक्के पडला. असे असले तरी पुणे जिल्ह्यासारख्या भागात आज जलसाठे तीस टक्क्यांवर पोहोचले आहेत म्हणजे मे महिन्यापर्यंत ते पुरणार नाहीत. मग पडलेला पाऊस कुठे गेला असा प्रश्न पडतो. त्याआधी हवामान विभागाने सरासरी-पेक्षा कमी पाऊस पडेल असे म्हटले होते. कमी म्हणजे सरासरीपेक्षा सहा टक्के कमी. प्रत्यक्षात वेगळेच घडले. याचा अर्थ सॅटॅलाइट अवकाशात पाठवून, अत्याधुनिक यंत्रणा उभारूनही अंदाज खोटे ठरतात. महाराष्ट्रात मराठवाड्यातील हवामान तज्ञां वर लोकांचा फार विश्वास आहे. एवढी मोठी भारत सरकारची हवामान खात्याची यंत्रणा एका बाजूला आणि लोकांची त्या इसमावरील श्रद्धा एका बाजूला अशी अवस्था आहे. तथापि संबंधित तज्ञ देखील देश परदेशातील हवामानाच्या अंदाजावरच अवलंबून असतो हे सर्वसामान्य माणसाला अजून माहिती नाही. त्यामुळे त्यांचे दुकान बऱ्यापैकी चालते.

महाराष्ट्रापुरते बघितल्यास हवामान खात्याने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्र, मराठवाडा विभागात आणि नेहमीप्रमाणे कोकण विभागांसह समुद्र तटावर भरपूर पाऊस पडेल. खाजगी आणि सरकारी हवामान खात्याचे अंदाज दरवर्षीप्रमाणे यंदाही वर्तविण्यात आलेले आहेत. प्रत्येक वर्षी असेच बहुदा अंदाज असतात. त्यामागे एक अर्थकारण दडलेले असते. शेतीविषयक निविष्ठा निर्माण करणाऱ्या ज्या कंपन्या आहेत त्या बहुतेक बहुराष्ट्रीय आहेत. त्यांचे लागेबांधे सरकारशी असतात. त्यांची उत्पादने मोठ्या प्रमाणावर खपावीत अशी एक योजना असते. आणि त्यासाठी हवामान खात्याने समाधानकारक अंदाज व्यक्त करावयाचा असतो. अशी काही गणिते आहेत. दरवर्षीचा असा अनुभव आहे की हवामान खात्याने किंवा खाजगी कंपन्यांनी हवामानाचा अंदाज सर्वांना आनंद व्हावा असा व्यक्त केला की कृषिविषयक कंपन्यांचे शेअर बाजारात प्रचंड व्यवसाय होतात. कमी पावसाची टक्केवारी सांगितली तर बाजार कोसळतात. याचा अर्थ मोठ्या प्रमाणावर आनंद वार्ता पसरवून शेतकऱ्यांच्या नरडीचा घोट घेतला जातो. कुणासाठी तर आपल्या मित्र भांडवलदारांसाठी. प्रत्यक्षात पाऊस जास्त पडतो म्हणून शेतकऱ्यांचे नुकसान होते. किंवा पडत नाही म्हणून दुष्काळ पडतो. त्याचा टाईम टेबल निश्चित नसतो म्हणूनही शेतकरी सतत संकटात सापडतो. एका तऱ्हेने त्याला शेतीच्या जुगाराला सामोरे जावे लागते. पण धंदा ज्यांचा काही संबंध शेतीशी नाही त्यांचा होतो. बड्या भांडवलदारांना किंवा कृषी निविष्ठांचे उत्पादन करणाऱ्यांना भुईमुगाच्या शेंगा कुठे लागतात किंवा कपाशीची बोंडे कशी असतात यासंबंधी विचारले तर काहीही सांगता येणार नाही. त्यांच्याजवळ तज्ञ भलेही असतील. परंतु त्यांना स्वत:ला शेतात मात्र जावे लागत नाही. शेतकऱ्यांचे कष्ट त्याना माहिती नसतात. जे माहिती असते तो केवळ जुगार असतो. शेअर बाजारातील गुंतवणूक असते. आणि ती शेतकऱ्याच्या जिवावर असते. प्रत्यक्ष शेअर बाजाराशी शेतकऱ्यांचा काहीही संबंध नसतो. म्हणजे आईच्या जीवावर बाईजी उदार अशी अवस्था सध्या तरी आपल्या देशात आहे. पूर्वी पावसाच्या अंदाजावर सट्टाबाजी होत नसे. शेअर बाजार देखील वधारला काय आणि घसरला काय काहीच कोणाला कळत नव्हते. पण आता सर्रास हवामानाच्या अंदाजाचा वापर शेअर बाजारासाठी होतो. शासनालाही याबाबतीत काही घेणे देणे (पान ३ वर)

## शहाद्यात जीतो महिला संघटना नूतन कार्यकारिणीचा शपथ ग्रहण समारंभ

**शहादा, दि.१६ (का.प्र.)- महिला वर्गाला नवनवीन उद्योग व्यवसाय करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध आहे. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत कुठल्याही क्षेत्रात महिलांना यशस्वी होण्यापासून कोणी रोखु शकत नाही.महिला वर्गात काम करण्याची क्षमता पुरुषांपेक्षा खुप पटीने जास्त असतांना धाडस करीत नसल्याने जीतो महिला संघटनेच्या माध्यमातुन महिलांना धाडसी बनविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन डिम्पल पगारिया यांनी केले आहे.**



शहादा येथील जैन प्लाझाच्या सभागृहात जीतो महिला संस्थेच्या नुतन कार्यकारणी शपथ विधी प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सरोज लोढा, पारस ओसवाल, दिपक मोदी, अनिता सेठीया, हरचंद जैन, प्रतिभा पहाडे,रिता जैन, प्रतिभा जैन अदि प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप्रज्वलन करण्यात आले. कुठल्याही क्षेत्रातील सामाजिक कार्य व सेवा महत्वाची आहे. जीतो महिला समाजसेवा संस्थेचे वतीने देश विदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता आर्थिक मदत तसेच महिलांना बचत गटाचा माध्यमातून पापड, साडी बनविणे व इतर उद्योग सुरू करण्यासाठी प्लॅटफार्म मिळवून देणे हा उद्देश आहे.महिलांमधील कामांची क्षमता लक्षात घेत कलाकौशल्य,महिलांचे कामाला चालना देण्यासाठी जीतो संस्था सातत्याने पाठपुरावा करत आहे. हरचंद जैन यांनी मार्गदर्शन करतांना म्हटले की, महिलांच्या कामाची गती आहे, विकासात्मक कामांबाबत विविध कल्याणकारी योजना सुरु करण्याचे धाडस आहे.ग्रामीन भागात महीला बचत गटाचा माध्यमातून विविध नाविन्यपूर्ण उत्पन्न सुरु करुन रोजगाराची संधी त्यांनी उपलब्ध करून घेतली आहे. यावेळी डॉ.कांतीलाल टाटिया, श्री महावीर नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रमेशचंद्र जैन, विनय गांधी सुमतीलाल जैन, प्रकाशचंद कोटडिया, पारस जैन, ललित जैन, संजय छाजेड, डॉ.राजेश जैन, विनोद जैन, पत्रकार ईश्वर पाटील, हेमल गांधी, समीर टाटिया, अनिल छाजेड आदिंची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रियंका जैन तर आभार रिता जैन यांनी केले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिभा जैन, कविता संचेती, सुरेखा छाजेड, माला गेलडा, प्रिती जैन यांनी केले आहे.

## शासनाच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्याचे ग्राहक पंचायत करणार विश्लेषण; अनोखा उपक्रम

**धुळे, दि.१६- ग्राहक पंचायत महाराष्ट्रने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील शंभर दिवसांचा सात कलमी कृती आराखड्याचे विश्लेषण, फेरतपासणी (काऊंटर चेक) करण्याचा एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. याची महिती राज्याध्यक्ष डॉ.विजय लाड यांनी ऑनलाइन बैठकीत दिली.**

ग्राहक पंचयत महाराष्ट्रची ऑनलाईन बैठक काल आयोजित केली होती. या बैठकीला महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यातून जवळपास ३१ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीला स्वामी विवेकानंद व ग्राहकतीर्थ बिंदूमाधव जोशी यांना नमन करून सुरुवात झाली. प्रास्ताविक राज्याचे सचिव प्रा.एस. एन.पाटील यांनी केले. राज्य सचिव अरुण वाघमारे म्हणाले, राज्य अध्यक्ष डॉ.विजय लाड यांच्या मार्गदर्शनाने, प्रकल्पप्रमुख डॉ.ज्ञानचंद्र पाटील (सांगली) यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम हाती घेतला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील १०० दिवसांचा ७ कलमी कृती आराखड्याचे विश्लेषण, फेरतपासणी (काऊंटर चेक) करुन तवस्तुनिष्ठ अहवाल मुख्यमंत्री, मुख्य सचिव, व जिल्हा अधिकारी यांच्याकडे व १ प्रत राज्य टिमकडे पाठविली जाईल. ७ कलमांपैकी, ४ थे कलम-जनतेच्या समस्यांचे निराकरण याला अनुसरुन आपण, सर्व जिल्ह्यांनी, सर्व तालुक्यांनी, सर्व महानगरांमधील साधकांनी, सर्वप्रथम आय कार्ड घालुन ५/६ साधकांनी, आपआपल्या क्षेत्रातील १७ आवश्यक सेवा विभागांपैकी १, २ किंवा ३ कार्यालयात जावे, आपली ओळख द्यावी, सोबत आपल्या संघटनेने ३३ प्रश्नावली आपल्या लेटरहेड वर घेऊन प्रशासकीय कार्यालयात जावे. प्रशासनमित्र म्हणुन सौजन्याने व सहकार्याने वागावे. यासाठी तत्सम ऑफीसच्या जबाबदार अधिकाऱ्यांना भेटावे, तसेच शेवटी येतांना त्यांच्याकडुनच अहवालावर सही, शिक्का घ्यावा. तत्सम विभागाला ओसी म्हणुन एक प्रत देखिल द्यावी, असे ते म्हणाले.

राज्य संघटिका मेधाताई कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. बैठकीला राज्य अध्यक्ष डॉ.विजय लाडसह संघटिका मिना कुलकर्णी, सुनीता राज घाडगे पाटिल, प्रदेश सदस्य प्रमोद कुळकर्णी, हेमंत मराठे, नाशिक विभाग अध्यक्ष डॉ.अजय सोनवणे, धुळे जिल्हाध्यक्ष ॲड. जे.टी.देसले, संघटक प्रा.चंद्रकांत डागा, सचीव एस.एम.पाटिल आदी उपस्थित होते.

## प्रा.मोहम्मद अली सैय्यद यांना पी.एच.डी. प्रदान

**शिरपूर, दि.१६- शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी.पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागातील प्रा.मोहम्मद अली मुझफ्फर अली सय्यद यांना क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथून संगणक अभियांत्रिकी विषयामध्ये डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली.**



धुळे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सेक्रेटरी मुझफ्फर अली सय्यद यांचे सुपुत्र तर पोलिस निरिक्षक इफ्तेकार सय्यद यांचे मोहम्मद अली सय्यद लहान बंधु आहेत. या यशाबद्दल जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे, मनोहर चौधरी, ॲड.रवी देसर्डा, ॲड.सी.डी.सोनार, राज्य कबड्डी असोसिएशनचे सेक्रेटरी बाबुराव चांदोरे, खजिनदार मंगल पांडे व इतर क्रीडा संघटनांसह समाजातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर अभियान जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी बैठक

**नंदुरबार, दि.१६ (प्रतिनिधी) - शासनाच्या २५ मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार, जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, डॉ.मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक संपन्न झाली.**

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सावन कुमार तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार आणि गटविकास अधिकारी उपस्थित होते. बैठकीत शासन निर्णयानुसार क्षेत्रीय स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी दिले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील सामान्य जनता, शेतकरी आणि महिला यांचे दैनंदिन प्रश्न सोडवणे आणि तक्रारींचे तात्काळ निराकरण करणे हा आहे. तसेच प्रशासनाला अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान करणे हा देखील या अभियानाचा उद्देश आहे.

या अभियानाअंतर्गत जिल्ह्यात १७ एप्रिल ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत ग्रामीण भागात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. तालुका स्तरावर तहसिलदार, गटविकास अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी संयुक्तपणे शिबिरांचे आयोजन करतील. या शिबिरांमध्ये महसूल, ग्रामविकास आणि कृषी विभागाकडील विविध दाखले याबाबत लाभ देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील नागरिकांना या विशेष शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांनी केले आहे.

## सप्तशृंगी माताजी मंदिर येथे भंडारा कार्यक्रम उत्साहात

**शहादा, दि.१६ (प्रतिनिधी)- येथील दोंडाईचा रस्त्यावरील सप्तशृंगी मंदिराच्या आवारात हनुमान जयंती निमित्ताने भव्य महा आरती व हनुमान चालीसा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हजारो भक्तांच्या उपस्थितीत महाआरती करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.**



हनुमान जन्मोत्सवाच्या दिवशी सायंकाळी सप्तशृंगी माता मंदिराच्या आवारात मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, मुक्तेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष यशवंत चौधरी, संकल्प ग्रुपचे माजी अध्यक्ष पिनाकिन पटेल, लक्ष्मीकांत अग्रवाल यांच्यासह मान्यवरांनी सपतकीक महाआरती केली. शहरातील शेकडो भाविक उपस्थित होते. त्यानंतर उपस्थित भाविकांनी हनुमान चालीसाचे पठण केले. भागवताचार्य हर्षल कुलकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुंदर भजने सादर करून हनुमान चालीसा पठण केले. सप्तशृंगी माता मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. हनुमान जयंतीनिमित्त उशिरा रात्रीपर्यंत हजारो भाविकांना भंडारा महाप्रसाद वाटप करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सप्तशृंगी माता मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल व त्यांचे सहकारी, पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमांसाठी योगदान दिले.

## नंदुरबारला पुण्यतिथी उत्सव सप्ताहास प्रारंभ

नंदुरबार, दि.१६(प्रतिनिधी)- शहरात २०० वर्षां पूर्वी स्थापित केलेल्या ऐतिहासिक श्री द्वारकाधीश मंदिर संस्थानचे संस्थापक परमपूज्य वैकुंठवासी हभप श्रीमद सद्गुरु विठ्ठल स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सव सप्ताहास प्रारंभ झाला आहे. दि.१४ एप्रिल पासून प्रारंभ झालेल्या पुण्यतिथी सप्ताहाची सांगता सोमवार दि.२१ एप्रिल रोजी होईल. या सप्ताह दरम्यान दररोज श्री द्वारकाधीश मंदिरात सकाळी काकड आरती, मंगला आरती, धूप आरती इ. धार्मिक उपक्रम होत आहेत.


**CHANGE NAME**

MY OLD NAME WAS
**NAZIA PARVIN ABDUL HAFIZ**
MY NEW NAME IS
**NAZIYA PARVEEN PARVEZ AKHTAR ANSARI**
ADDRESS- 4381, LANE NO.5, AGRA ROAD, NEAR NURANI MASJID, DEOPUR, DHULE-424002

**नावात बदल**

माझे लग्न आधीचे नाव
**कु.कल्याणी सचिंद्र सिसोदे**
माझे लग्न नंतरचे नाव
**सौ.कल्याणी कुणाल सोनवणे**
पत्ता- प्लॉट नं.३१, इंदिरा हौसिंग सोसायटी, दत्तमंदीर चौक, देवपूर, धुळे.

### शब्दकोडे क्रमांक : २१३९



**आडवे शब्द :** १.सबब ३.मृदू ५.संगम ६.साधारण दोन मैल ७.संख्या ८.मित्र ११.धोका १२.वायदा १३.रस्सा १४.करतूद १६.मागणी, एखाद्या मालाची वाढलेली विक्री १७.आपला झेंडा १८.पिता २०.रवानगी २२.ऐश्वर्य २४.जन्म २६.नेहमी २९.नूतन, सुनील दत्त यांचा एक सिनेमा ३०.इच्छा ३२.विविध ३३.वीज ३५.रम-उलट लिहा ३७.चुंबन ३८.माहीतीतला ४०.आधी ४१.'पळसाला पाने - -' एक म्हण ४२.फुलांचा राजा ४४.गोंगाट ४६.एक हिंदी सिनेमा '- - - पगला दिवाना' ४९.पवित्र ५०.एक तांदूळाची जात ५१.एक मोठ्या आकाराचे फळ

**उभे शब्द :** १.क्रांतिकारी पंडीत रामप्रसाद बिस्मिल यांच्या नेतृत्वाखाली ९ ऑगस्ट १९२५ रोजी कोणत्या स्थानकात ब्रिटीशांचा खजाना लुटण्यात आला २.स्ची ३.कोर्टात सुरु असलेली केस ४.हवन ५.एक पालेभाजी ८.सरळ स्वभावाचा ९.मुलगा १०.एक लहान आकाराचे फळ १२.उपयोग १३.एक तंतुवाद्य १७.तीन वेळा १९.खूप आत २१.वाईट इच्छा २३.रात्र २४.जनतेने नोंदवलेले मत २५. कणीस २७.कारणा शिवाय २८.'राम तेरी गंगा मैली' सिनेमातील नायिका ३१.ठेका ३४.समि- उलट लिहा ३६.आपल्या अवती भवतीच्या वातावरणाशी,ग्रह- तारे संबंधित विषयावर भाष्य करणारा विषय ३८.माहीती ३९.विदेशी ४१.शर ४३.हिंदीत- बॉम्ब ४४.दु:ख ४५.सेवक ४७.लहर ४८.'हेराफेरी' सिनेमातील 'परेश रावल' यांनी साकारलेल्या भूमिकेचे नाव '- - भाय'

शब्दकोडे क्रमांक : २१३८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| के | दा | र | ना | थ | | कं | दि | ल | | कि | स |
| व | म | न | | र | स | | वा | स | रू | | ब |
| ल | | वे | त | | र | वा | ना | | ख | रा | ब |
| | का | | फा | र | क | त | | क | व | ठ | |
| भ | र | धा | व | | ता | | गं | म | त | | वि |
| | भा | | त | डा | | प | गा | र | | स | मा |
| भा | र | त | | वा | घा | | ज | | मि | ल | न |
| ब | | ग | स्त | | स | व | ल | त | | ग | त |
| डा | ल | डा | | सा | ले | म | | फा | र | | ळ |
| | व | | कु | | ट | | घा | व | | पा | |
| चा | क | र | मा | नी | | छा | | त | र | की | ब |
| चा | र | | र | | ते | व | र | | म | जा | ल |












(पान २ वरुन) नाही. सरकार तर भांडवलदार मित्राची भलाई करण्यासाठीच काम करीत असते असा अनुभव आहे. तेव्हा शेतकऱ्यांनी ही बाब लक्षात घेऊन पावसाळ्याबाबत सावध असणे केव्हाही फायदेशीर ठरेल.

लडाख, ईशान्य भारत आणि तटवर्ती तामिळनाडू वगळता देशाच्या इतर भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे. दक्षिण कोकण, किनारपट्टी, मराठवाड्यात चांगल्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रात जो प्रदेश येतो त्यात विदर्भ आणि

# पावसाचे आनंद दायी वर्तमान पण..!

खानदेश अर्थात उत्तर महाराष्ट्र येत नाही. उत्तर महाराष्ट्र मध्य प्रदेश आणि गुजरातला लागून असलेला सातपुडापर्वता लगतचा भाग आहे. तसेच विदर्भातील ११ जिल्हे हे मध्यप्रदेश आणि छत्तीसगडला लागून असलेले तर तिकडून दक्षिणेतील राज्यांना लागून असलेले जिल्हे आहेत. या प्रदेशात नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ वर्धा या जिल्ह्यात दरवर्षी हवामानाचा अंदाज येवो की न येवो भरपूर पाऊस पडतो.

उलट पश्चिम विदर्भ म्हणजे अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा या जिल्ह्यात कमी पाऊस असतो. याचे कारण पूर्व विदर्भात असलेली जंगले. आणि पश्चिम विदर्भात असलेली कमी जंगले आहेत. तोच परिणाम उत्तर महाराष्ट्रात दिसतो. या प्रदेशात नाशिक जिल्हा वगळला तर सातपुड्याच्या पट्ट्यातील नंदुरबार जिल्ह्यात बरा पाऊस असतो. पण यावर्षी उत्तर महाराष्ट्रा विषयीचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केलेला नाही. तो मध्य महाराष्ट्रात मोडत नसल्यामुळे याबाबतीत शासंकता आहे ती संबंधित विभागाने दूर केली पाहिजे. अर्थात हवामान खात्याचा हा प्राथमिक अंदाज आहे. यानंतर मे महिन्याच्या अखेरीस किंवा जून महिन्याच्या सुरुवातीला आणखी एक अंदाज पत्रकार परिषद घेऊन हवामान खाते जाहीर करील तेव्हा या दोन्ही प्रदेशाचा विचार करून अंदाज व्यक्त झाले पाहिजेत. शेवटी शेतकऱ्यांनी आपली जी पारंपरिक हवामानासंबंधीची पद्धत आहे ती देखील अमलात आणली पाहिजे. निसर्गाशी संबंधित ते अंदाज असल्याने त्याचे महत्त्व नाकारता येणार नाही.

## सोनगीर सरपंच रंजना मोरे अपात्र

**(पान २ वरुन)** पंचायतीचे सदस्य आणि सरपंच म्हणून उर्वरित कालावधीसाठी अपात्र घोषित केले आहे.या प्रकरणातील तक्रारदार रुक्मिणीबाई गोरख ठाकरे या माजी सरपंच आहेत आणि अपात्र ठरलेल्या रंजना शामलाल मोरे त्यांच्या भावजयी (भावाची पतकी) आहेत. यापूर्वी, रुक्मिणीबाई ठाकरे यांचे बंधू आणि रंजना मोरे यांचे पती श्यामलाल मोरे यांच्या तक्रारीमुळे रुक्मिणीबाई ठाकरे यांना सदस्य आणि सरपंच पद गमवावे लागले होते. अशा प्रकारे, एकमेकांविरुद्ध केलेल्या तक्रारींमुळे नात्यातील व्यक्तींनाच सरपंच पद गमावण्याची वेळ आली आहे.


## पाहिजेत

लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या. धुळे मध्ये एक क्लार्क व एक शिपाई लावणे आहे. (क्लार्क साठी शिक्षण-कमीत कमी बी.कॉम. पास तर शिपाईसाठी शिक्षण- कमीत कमी १२ वी पास). अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल तरी इच्छूकांनी दुपारी ५.०० ते ७.०० या वेळेत संपर्क साधावा.

**संपर्क- फोन/मोबाईल नं.(०२५६२)२३५६७७**

**मॅनेजर- लोकमान्य नागरी सह.पतसंस्था मर्या. धुळे**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सौ.स्मिता प्रदीप देशपांडे रा.धुळे ह.मु.पुणे याच्यांशी आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदे करार केलेला असून लवकरच सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार आहे, सदर मिळकतीच्या टायटल व्हेरीफिकेशन हेतू सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

सदर मिळकतीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, कोणाचेही गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदे करार हक्क अगर खरेदी हक्क वैगेरे काहीही असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ दिवसांचे आंत त्याबददल स्वताच्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे असे समजूण सदर व्यवहार पूर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.

**परिशिष्ट**

मौजे धुळे ता.जि.धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीतील महात्मा ज्योतीबा फुले सह गृहनिर्माण सोसायटी मर्या, धुळे येथील सिटीसर्व्हे क्रमाक ४६२४/ब चे एकूण क्षेत्र १७७४१.०० चौ.मी. पैकी प्लॉट क्रमाक १७अ चे क्षेत्र १५००.०० चौ.फुट (२५X६०) चा संपूर्ण बखळ प्लॉट मिळकत असून यात सुमारे ४० ते ४५ वर्षे जुने दुमजली लोडबेअरींग बांधकामाचे क्षेत्र ७५०.०० चौ.फुट अशी बखळ व बांधकामासहीत असलेली मिळकत, यासी मापे पुर्व पश्चिम सुमारे २५ फुट दक्षिण उत्तर सुमारे ६० फुट, यासी चतुसिमा येणेप्रमाणे असे.

पुर्वेस- प्लॉट क्रमाक १६ क, पश्चिमेस- प्लॉट क्रमाक १७ ब,
दक्षिण- सोसायटीची राखीव जागा, उत्तर- वापर व पुढे रस्ता

सदर जाहीर नोटीस अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. **दि.१६/०४/२०२५.**

**ॲड.शैलेश मदनलाल पंसारीया**

ऑफिस- ५, दिघे ॲडव्होकेटस चेंबर्स, धुळे जिल्हा कोर्टासमोर, स्टेशन रोड, धुळे-४२४००१

**मो.नं.९७६६२५५७७९, ९१७२१८१७७७**

## शहादा नगरपरिषद, शहादा जि.नंदुरबार
## जाहीर नोटीस

श्री.डॉ.बाळकृष्ण दामोदर पटेल व इतर रा.शहादा यांनी शहादा नगरपालिका हद्दीतील श्री.बाळकृष्ण दामोदर पटेल यांचा स्वत:च्या मालकीच्या सि.स.सर्व्हे नं.६७/२, शहादा क्रिटिकेअर सेंटर, खेतिया रोड, शहादा, जि.नंदुरबार येथे शहादा क्रिटिकेअर सेंटर चा व्यवसाय सुरू करणे कामी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केलेला आहे.

तरी सदर व्यवसाया बाबत कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत खालील सही करणार यांचे कडेस लेखी हरकत सादर करावी. मुदती नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

शहादा नगरपरिषद, शहादा

**जा.क्र.७१०**

**दिनांक- २८/०३/२०२५**

**मुख्याधिकारी**
**शहादा नगरपरिषद, शहादा**

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS **SAIYAD ANIS SAIYAD SATTAR** MY NEW NAME IS **ANIS SATTAR SAYYAD**

ADD- PLOT NO.311, JAMNA WADI TIRANGA CHOUWK 80 FEET ROAD DHULE-424001 (M.S.) INDIA

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS **SHAMSHER KHAN MAHEBOOB KHAN** MY NEW NAME IS **SHAMSHERKHAN MAHABUBKHAN** AS PER DOCUMENTS

ADD- 11/B MANIYAR PLOTS CHALISGAON ROAD, NEAR NATIONAL URDU SCHOOL, DHULE-424001 ( M.S.)

## NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM **SHABANA BI AYAZ AHMAD** TO **ANSARI SHABANA BANO AYAZ AHMAD**

ADD- GALLI NO.14, MADHAVPURA, NEAR DR.ZAKIR, DHULE-424001

## NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM **SAMADHAN GOVINDA WAGH** TO **SAMADHAN GOVIND WAGH**

ADD- 02, ANUJA SOCIETY, WALWADI SHIVAR, NAKANE ROAD, DHULE-424001

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी मौजे चितोड येथिल गट नं.१७/२ पैकी १) प्लॉट नं.५४ चे एकूण क्षेत्र १६५ चौ.मी., २) प्लॉट नं.५५ चे एकूण क्षेत्र १९८ चौ.मी., ३) प्लॉट नं.५६ चे एकूण क्षेत्र १५६.७५ चौ.मी., ४) प्लॉट नं.५७ चे एकूण क्षेत्र १६५ चौ.मी.चा बखळ प्लॉट, यासी चर्तुसिमा मंजुर ले-आऊट प्रमाणे येणे प्रमाणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट हा १) सौ.सरला सुभाष अग्रवाल, २) सौ.पुष्पा पवन अग्रवाल दोन्ही रा.अग्रवाल नगर मालेगांव रोड, धुळे, यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे चारही बखळ प्लॉट हे आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून ब्याना सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, सदर बखळ प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास, बखळ प्लॉट वर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर बखळ प्लॉट संबंधी कोणत्याही प्रकराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती, विक्री पावती, खरेदीखत करुन दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर बखळ प्लॉट निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहु बखळ प्लॉटचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. **दिनांक-१५/०४/२०२५, स्थळ-धुळे.**

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**

ग.नं.४, भांडी बाजार, कांती काम्प्लेक्स शेजारी, धुळे.

**मो.नं.७७०९७७२७५७, ७५८८८८४१०७**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी मौजे देवपूर येथील स.नं.३९/१ पैकी प्लॉट नं.२ चे एकून क्षेत्र ४०३.१९ चौ.मी. यास विस्तारीत सि.स.नं.४७९६ चे क्षेत्र ४०३.७० चौ.मी. यापैकी उत्तरेकडील भागा चे क्षेत्र १३०.८० चौ.मी.ची बखळ जागा व त्यावरील लोडबेअरींगची बांधीव मिळकत, यासी चर्तुसिमा पुर्वेस- रस्ता व वापर, पश्चिमेस- प्लॉट नं.१३, उत्तरेस- प्लॉट नं.३, दक्षिणेस- याच प्लॉटचा उर्वरीत भाग, येणे प्रमाणे वर्णनाचा आतील बांधीव मिळकत ही श्री.अमोल छबीलाल पाटील रा. रा. मु.पो. कापडणे, ता.जि.धुळे, यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे शेतजमीन ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून ब्याना सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, सदर बांधिव मिळकतवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास, बांधिव मिळकत वर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर बांधिव मिळकत संबधी कोणत्याही प्रकराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती, विक्री पावती, खरेदीखत करुण दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर बांधिव मिळकत निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहु बखळ प्लॉटचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. **दिनांक-१६/०४/२०२५, स्थळ-धुळे.**

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**

ग.नं.४, भांडी बाजार, कांती काम्प्लेक्स शेजारी, धुळे.

**मो.नं.७७०९७७२७५७, ७५८८८८४१०७**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी मौजे धुळे, आग्रारोड, गांधी पुतल्या जवळ, सि.स.नं.१८/ब/१ चे एकूण क्षेत्र ६५ चौ.मी.ची बखळ जागा, यासी चर्तुसिमा नकाशा प्रमाणे, येणे प्रमाणे वर्णनाचा आतील बखळ जागा ही १) शिवचंद्र विजयराव सांगळे, २) स्वप्नील विजयराव सांगळे दोन्ही रा.साई आनंद अपार्टमेंट, गिता नगर, देवपूर, धुळे, यांच्या मालकीचे व ताबेउपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे बखळ जागा ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून ब्याना सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, सदर बखळ जागेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहारा बाबत हरकत असल्यास, बखळ जागे वर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टाच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर बखळ जागा संबंधी कोणत्याही प्रकराचा न्यायालयात दावा न्याय प्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदापावती, विक्री पावती, खरेदीखत करुन दिलेले असल्यास, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर बखळ जागा निर्वेध व निर्बोज समजून आमचे अशिल सदरहु बखळ जागेचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या आशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. **दिनांक-१५/०४/२०२५, स्थळ-धुळे.**

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**

ग.नं.४, भांडी बाजार, कांती काम्प्लेक्स शेजारी, धुळे.

**मो.नं.७७०९७७२७५७, ७५८८८८४१०७**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, मौजे देवपूर ता.जि.धुळे येथील

१. ७/१२ उताऱ्या प्रमाणे मौजे देवपूर येथील स.नं.६६/१ अ+६६/१/ब यापैकी प्लॉट नं.६० चे एकूण क्षेत्र २०२.५० चौ.मी. सि.स.उताऱ्या प्रमाणे- यास लागू विस्तारीत सि.स.नं.२५३९/४१ चे क्षेत्र २०२.५० चौ.मी. बखळ प्लॉट

२. ७/१२ उताऱ्या प्रमाणे मौजे देवपूर येथील स.नं.६६/१ अ +६६/१/ब यापैकी प्लॉट नं.६१ चे एकूण क्षेत्र १५० चौ.मी. सि.स.उताऱ्या प्रमाणे- यास लागू विस्तारीत सि.स.नं.२५३९/४२ चे क्षेत्र १५० चौ.मी. बखळ प्लॉट

३. ७/१२ उताऱ्या प्रमाणे मौजे देवपूर येथील स.नं.६६/१ अ + ६६/१/ब यापैकी प्लॉट नं.६२ चे एकूण क्षेत्र १५० चौ.मी. सि.स.उताऱ्या प्रमाणे- यास लागू विस्तारीत सि.स.नं.२५३९/४३ चे क्षेत्र १५० चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा

| दिशा | प्लॉट नं.६० | प्लॉट नं.६१ | प्लॉट नं.६२ |
|---|---|---|---|
| पुर्वेस- | प्लॉट नं.६१, | प्लॉट नं.६२, | ६ मी रस्ता, |
| पश्चिमेस- | ९ मी. रस्ता, | प्लॉट नं.६०, | प्लॉट नं.६१, |
| दक्षिणेस- | १२ मी. रस्ता, | १२ मी. रस्ता, | १२ मी. रस्ता, |
| उत्तरेस- | प्लॉट नं.५९, | प्लॉट नं.५९ व ६३, | प्लॉट नं.६३. |

येणे प्रमाणे चतु:सिमाच्या वर्णनाची आतील बखळ प्लॉट रविंद्र जमनादास गुप्ता रा.धुळे, ता.जि.धुळे-४२४००१ यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यानी सदरहु बखळ प्लॉट कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे व बयाण्यांची रक्कम ही स्विकारली आहे.

आमचे अशिलांना सदर बखळ प्लॉटस् खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर बखळ प्लॉटस् च्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकती कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर सदर बखळ प्लॉटस् संबधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरच्या मिळकती निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. ठिकाण- धुळे, दिनांक-१६/०४/२०२५.

**ॲड.चेतन महादु यादव, मो.नं.९६८९१२४६९२**

पत्ता- सि.स.नं.२५९७/अ, श्रीसदगुरु सदन, गल्ली नं.५, मिरच्या मारुती चौक, धुळे-४२४००१.

## जाहीर नोटीसीस हरकत

तमाम जनतेस, सर्वे हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहीर हरकत नोटिसीद्वारे कळविण्यात येते की,

दि.१५/०४/२०२५ दै.आपला महाराष्ट्र या वर्तमानपत्रात ॲड.शैलेश एम पंसारीया, धुळे यांच्या मार्फत खालील नमूद मिळकतीबाबत प्रसिध्द जाहीर नोटीसीस आमचे अशिल श्री.किशोर मोतीलाल लोढा रा.२८६७/३, आग्रा रोड, पाचकंदील, धुळे यांची तीव्र हरकत आहे.

मौजे मोहाडी प्र.ल.ता.जि.धुळे येथील गट क्रमाक १७८/१/अ/१/अ यापैकी प्लॉट क्र.२/क चे क्षेत्र ५२४.३० चौ.मी. (५६४१.४६ चौ.फुट) ची बखळ प्लॉट मिळकतीचे मालक श्री.मोहन कालीदास खैरनार व अनिल कालीदास खैरनार दोन्ही रा- प्लॉट नं.१८, दामोदर नगर, तिखी रोड, पोलीस स्टेशन जवळ, मोहाडी, धुळे यांनी सदर मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा सौदे करार आमच्या अशिलांशी केलेला असून सौदयापोटी भली मोठी रक्कम स्विकारून सौदेकरारातील अटी व शर्तीची पुर्तता न करता सदर मिळकत परस्पर तिऱ्हाईकास अधिक लालस बुध्दीने विकण्याचा गैरइरादयात असल्याने सदर नोटीसीवरून स्पष्ट होते.

सबब सर्व संबंधीतांनी आमच्या अशिलांच्या व्यवहाराची नोंद घेवून सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारे व्यवहार, तबदीली वैगेरे करू नये. याउपरही केल्यास सदर व्यवहार सदर मिळकत व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची गंभीर नोंद घ्यावी.

**धुळे, दिनांक-१६/०४/२०२५.**

**ॲड.राजेश नंदलाल अग्रवाल**

ऑफिस- ५, दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, धुळे जिल्हा न्यायालया समोर, स्टेशन रोड, धुळे.

**मो.नं.९८५००९२७५३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,
मौजे नकाणे येथील गट नं.३३/२ पैकी

१. प्लॉट नं ८/अ चे क्षेत्र १३६ चौ.मी. बखळ प्लॉट. यासी चतु:सिमा
पुर्व- प्लॉट नं.९ब, पश्चिम- रस्ता,
दक्षिण- प्लॉट नं.७ब, उत्तर- प्लॉट नं.८ब.

२. प्लॉट नं ८/ब चे क्षेत्र १३३.८७ चौ.मी. बखळ प्लॉट. यासी चतु:सिमा
पुर्व- प्लॉट नं.९अ, पश्चिम- रस्ता,
दक्षिण- प्लॉट नं.८अ, उत्तर- गट नं.४३.

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक श्री.शंकरलाल कजोडमल जाखड रा.४९, प्रमोद नगर, देवपूर, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे व बयाणा रक्कम दिली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

**धुळे, दिनांक-१३/०४/२०२५.**

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**

ब्लॉक नं.आर/२, रूम नं.१, कुमार नगर, साक्री रोड, धुळे

**मो.नं.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५**

ॲड.सी.जे.सुर्यवंशी, धुळे

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे.उपविभागीय अधिकारी सो. धुळे भाग धुळे यांचे पिठासनासमोर**

आर.टी.एस.अपील क्र.८१/२०२४

रविंद्र उर्फ रविंद्रनाथ साहेबराव माळी (रोकडे) ..... **अपीलकार**

**विरूध्द**

दिलीप साहेबराव माळी, वगैरे ..... **जाबदेणार**

या कामातील जाबदेणार क्र.३ मंगलाबाई उर्फ उज्वला भ्र.देविदास महाजन, रा.साई हॉस्पिटलजवळ, चाळीसगांव, ता.चाळीसगांव जि.जळगांव यांना या नोटीसीन्वये कळविण्यात येते की, अपीलकार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे या मे.पिठासनात आर.टी.एस.अपील क्र.८१/२०२४ चे कामी आपणास सातत्याने नोटीस वर नमूद पत्त्यावर काढण्यात आल्यात. मात्र आजतागायत सदरच्या नोटीसीची बजावणी झालेली नाही.

तरी या जाहीर नोटीसीन्वये कळविण्यात येते की,

धुळे येथील मे.उपविभागीय अधिकारी सो.धुळे भाग धुळे यांचे पिठासनासमोर आपण दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता स्वत:अथवा आपण अधिकार दिलेल्या इसमास अथवा विधीतज्ञास, वकीलास वकीलपत्र देवून उपस्थित ठेवावे. आपल्यामार्फत सदर कामी कोणीही उपस्थित न झाल्यास सदर प्रकरणी आपले काहीएक म्हणणे नाही असे समजून एकतर्फा कामकाज चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे, दिनांक- १६/०४/२०२५

आदेशावरुन

**अधिक्षक** (कोर्टाचा शिक्का) **उपविभागीय अधिकारी धुळे भाग, धुळे**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँक, पतसंस्था, सर्व वित्तीय संस्था, सावकार व इतर सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसी अन्वये कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टातील नमूद श्री.योगेंद्र भिकाजी बारसे यांचे मौजे धुळे ता.जि.धुळे महानगरपालिका हद्दीतील गट क्र. व उपविभाग ५२१/२/अ/२ एकूण क्षेत्रफळ ४०.०० आर पैकी ४०% भाग आमचे अशिलाने कायम स्वरुपाने खरेदी करण्याचा सौदा केलेला असून लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार आहे.

खालील नमूद परिशिष्टातील सदर मिळकतीवर कोणाचा हक्क, दान, अधिकार, हिस्सा, वहिवाट किंवा तारण, गहाण, कर्ज, जामीन, बोझा, मृत्युपत्र, सौदा, टाच, सौदापावती, कुळवहिवाट, ऋणभार, आरक्षण, जप्ती, बक्षीस, मुखत्यारपत्र, भाडेकरार, खाजगी सावकार अगर इतर न्यायीक प्रकरणे, कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध, मोजमापासंबंधी काही तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात नोटीसीत नमूद पत्त्यावर समक्ष येवून हरकत नोंदवावी. तोंडी हरकती तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द करण्यात आलेल्या हरकती गृहीत धरल्या जाणार नाहीत. तसेच मुदती नंतर आलेल्या हरकतीं चा विचार केला जाणार नाही. वर नमूद मुदतीत कोणाचीही काहीएक हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज तसेच हस्तांतरणीय आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेली कोणाचीही तक्रार, हरकत आमचे अशिल व त्यांचे वारसांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. कळावे.

**परिशिष्ट**

श्री.योगेंद्र भिकाजी बारसे यांचे मौजे धुळे ता.जि.धुळे महानगरपालिका हददीतील गट क्र.व उपविभाग ५२१/२/अ/२ एकूण क्षेत्रफळ ४०.०० आर पैकी ४०% भाग ही मालकीची व ताबे उपभागातील मिळकत विक्री करण्याचा सौदा केला असून त्यास चतु:सिमा पुढीलप्रमाणे------

पुर्वेस- याच क्षेत्राचा उर्वरित भाग, पश्चिमेस- वापर व रस्ता,
दक्षिणेस- याच क्षेत्राचा उर्वरित भाग, उत्तरेस- नवले यांचे शेत.

सदर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या अधिकारावरुन प्रसिध्दीस दिली असे.

**धुळे, दिनांक-१६/०४/२०२५.**

**ॲड.सौरभ सुनिल जैन**

२२/अ, शिवशंकर कॉलनी, चितोड रोड, धुळे. **मो.नं.७७१८०१४९५३**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, शेतजमीन मौजे रावेर ता.जि.धुळे येथील धुळे म.न.पा. हद्दीबाहेरील गट क्र.३६/७ चे एकूण लावणी लायक क्षेत्र ० हेक्टर ८७ आर पोट खराब क्षेत्र ० हेक्टर १५ आर असे. एकूण क्षेत्र १ हेक्टर ०२ आर सदर शेतात येणे जाणे करीता वहीवाटीप्रमाणे रस्ता आहे व राहिल. यासी लागू चतु:सिमा मंजुर गांव नकाशा प्रमाणे

येणे प्रमाणे चतु:सिमाच्या वर्णनाच्या आतील शेतजमीन उताऱ्यावरील मालक मगनलाला रामदास देवरे (पाटील) राहणार मु.पो.रावेर ता.जि.धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील शेतजमीन असून त्यानी सदरहु शेतजमीन कायमस्वरूपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर शेतजमीन खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर शेतजमीनीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर शेतजमीनवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्यावर शेतजमीन संबधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची शेतजमीन निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण- धुळे, दिनांक-१६/०४/२०२५.

**ॲड.चेतन महादु यादव**

पत्ता- सि.स.नं.२५९७/अ, श्रीसदगुरू सदन, गल्ली नं.५, मिरच्या मारुती चौक, धुळे-४२४००१.

**मो.नं.९६८९१२४६९२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर, ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.१०४ पैकी प्लॉट नं.४५ चे क्षेत्र ४८७.७३ चौ.मी., यांस वि.सि.स.नं.६७०५ चे एकूण क्षेत्र ५२० चौ.मी., सत्ता प्रकार 'क' यांसी चतुः सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं.५२, उत्तरेस : प्लॉट नं.३६. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत १) कमलबाई आंनदसिंग राजपुत २) जयपाल आनंदसिंग सिसोदीया (राजपुत) ३) शारदाबेन महेंद्रसिंग जमादार ४) भारती (भारतीदेवी) प्रविणसिंग राजपुत ५) कल्पना आनंदसिंग राजपुत ६) कविता आनंदसिंग राजपुत, सर्व रा.होळनांथे, ता.शिरपुर, जि.धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिल १) श्री.गणेश नामदेव फुलपगारे, रा. गल्ली नं.१३, जुने धुळे, धुळे २) श्री.राजेंद्र लोटन गवळे, रा. गवळे नगर, देवपूर, धुळे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरतकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक-१६/०४/२०२५.

**ॲड.विजय म.मोरे**

नोटरी - भारत सरकार

रा.बी/१२, भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे.

**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि.धुळे येथील सर्व्हे नं.१५/४ पैकी प्लॉट नं.५० चे क्षेत्र १७० चौ.मी. यांसी चतुः सिमा पुर्वेस : प्लॉट नं.४९, पश्चिमेस : प्लॉट नं.५१, दक्षिणेस रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं.२८. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.दिपक यशवंत चित्ते, रा.सुरज हौ.सो., साक्री रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, हितसंबंध, देणे घेणे, वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्ये ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजुन अथवा कोणाचे हक्क, हितसंबध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक-१६/०४/२०२५.

**ॲड.विजय म.मोरे**

नोटरी - भारत सरकार

रा.बी/१२, भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे.

**मो.नं.९८२२८५२६५०**

# दि मोती अर्बन को.ओपरेटीव्ह बँक लिमिटेड, तळोदा

मुख्य शाखा कार्यालय, कॉलेज रोड, तळोदा जि.नंदुरबार-४२५४१३ (Reg.No.DLE.BNK(O)103 Date : 21/07/1997)

## ताबा सूचना

ज्या अर्थी **दि मोती अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, तळोदा** चे अधिकृत अधिकारी म्हणून मी खाली स्वाक्षरी करणार सिक्युरिटायझेशन ॲड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील कर्जदारांना मागणी करणारी नोटीस जारी केली होती. नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम ही नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याज, आनुषंगिक खर्च आणि इतर खर्चासह कर्जाची रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे विशेषत: कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला नोटीस देण्यास आली आहे की अधोस्वाक्षरीने कलम १३(४) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मी खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा ताबा घेतला आहे. सदर कार्यवाहीच्या तारखा खालील प्रमाणे (उक्त नियमांच्या नियम ९ सह वाचावे.)

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला सावध केले जाते की मालमत्तेच्या हस्तांतरणाचा कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी हस्तांतर संबंधी कोणतेही व्यवहार न करता खाली दिलेल्या रकमेसाठी **दि मोती अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, तळोदा** यांच्याकडून आकारले जाणारे शुल्क आणि व्याज आणि इतर खर्च.

| अनु क्र. | कर्जदार/जामीनदाराचे नाव आणि पत्ते | तारखेनुसार थकबाकी+ व्याज+खर्च | Demand Notice ची तारीख | जप्तीची तारीख | स्थावर मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | श्री.शांतीलाल सुरेश सोनवणे, (कर्जदार), पत्ता मु.पो.एन आर आय विला बंगला नं १८ मलोणी ता.शहादा, जि.नंदुरबार. | ३१/१२/२०२४ नुसार थकबाकी रू.२८,१५,०५०+ लागू न केलेले व्याज+ खर्च | ३०/०१/२०२५ | १६/०४/२०२५ | १. शहादा गाव मलोणी येथील भु.क्र.२२ प्लॉट ३७अ क्षेत्र १४४.३९ चौ.मी. आर.सी.सी. बांधीव ईमारत नोंदणीकृत तारण. |
| २ | श्री.बबन हरी चौधरी (जामीनदार) पत्ता मु.पो.प्लॉट नं १ सदाशिव नगर स्वस्तिक पेट्रोल पंपच्या मागे शहादा ता.शहादा, जि.नंदुरबार | | ३०/०१/२०२५ | १६/०४/२०२५ | |
| ३ | श्री.चेतन भिका चौधरी (जामीनदार) पत्ता मु.पो. प्लॉट नं ४ विजय नगर शहादा ता.शहादा, जि.नंदुरबार. | | ३०/०१/२०२५ | १६/०४/२०२५ | |
| ४ | सौ.उज्वला बबन चौधरी (जामीनदार) पत्ता मु.पो.प्लॉट नं १ सदाशिव नगर स्वस्तिक पेट्रोल पंपच्या मागे शहादा ता.शहादा, जि.नंदुरबार | | | | |

तारीख- १७/०४/२०२५, ठिकाण- तळोदा

**(वसंत आर.पाटील)**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि मोती अर्बन को-ऑप. बँक लि., तळोदा**

## पान १ वरुन

### सरन्यायाधीश पदासाठी गवईंची शिफारस

यापूर्वी, कायदा मंत्रालयाने न्यायमूर्ती खन्ना यांना त्यांच्या उत्तराधिकारीची निवड करण्याची औपचारिक विनंती केली होती. यामुळे नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली. जर न्यायमूर्ती गवई यांची नियुक्ती झाली तर ते भारताचे ५२ वे सरन्यायाधीश होतील. ते १४ मे रोजी सर्वोच्च न्यायिक अध्यक्षपदाची शपथ घेण्याची शक्यता आहेत. तर, न्यायमूर्ती गवई नोव्हेंबर २०२४ मध्ये निवृत्त होणार असल्याने ते फक्त सहा महिनेच भारताचे सरन्यायाधीश म्हणून काम पाहतील. न्यायमूर्ती गवई यांची २४ मे २०१९ रोजी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली.

### शहरातून जाणाऱ्या बसेसमुळे वाहतुकीची कोंडी

अवजड वाहतूक वाढल्याने रस्त्याची दुरावस्था झाली आहे. स्थानिक नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याने अवजड वाहतूक अन्य मार्गाने वळवावी या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले होते. त्यामुळे अवजड वाहतूक दुसऱ्या रस्त्यावरून वळविण्यात आली आहे, मात्र एसटी बसेससाठी याच रस्त्याचा वापर केला जात आहे. बस स्थानकापासून नगर पालिका चौकापर्यंत एसटी बसेस येजा करत असल्याने दिवसातून अनेकदा वाहतूक कोंडी होत आहे. मंगळवारी बाजाराच्या दिवशी गर्दी होत असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. वाहतूकीची दररोज होणारी कोंडी व संभाव्य अपघाताची शक्यता लक्षात घेऊन पोलिस, नगरपालिका, एसटी महामंडळ व जिल्हा प्रशासनाने दखल घेऊन उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### चोरीचा तपास अन् दोन गुन्हे उघडकीस

नंदुरबार) असे सांगितले. त्यास विश्वासात घेऊन नमुद गुन्हयाबाबत विचारपूस करता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदार नामे सुर्या ऊर्फ सुरेश रमेश गावीत (रा.सावरट, ता.नवापुर जि.नंदुरबार), प्रभु होळया गावीत (रा.उचीशेवळी, ता.नवापुर जि. नंदुरबार (दोन्ही सध्या धुळे जिल्हा येथील गुन्हयात अटकेत), रमेश गावीत (रा.गव्हाण, ता.निझार, जि. तापी गुजरात (फरार), सुभाष (पुर्ण नाव माहित नाही, रा. वळली, ता. निझर, जि.तापी गुजरात) (फरार) अशांनी मिळून केला असल्याची कबुली दिली. त्याअन्वये वर नमुद आरोपीकडुन एकुण १ लाख ८१ हजार रुपये किमतीचा सोयाबीन, तुरडाळ इ.असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन त्यामध्ये विसरवाडी पोलीस ठाण्यातील दोन गुन्हे उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश मिळाले आहे. ही कामगिरी पोलीस अधिक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक मुकेश पवार, तसेच पोहेकों. राकेश वसावे, पोना. मोहन ढमढेरे, पोशि. राजेंद्र काटके अशांनी केली आहे.

### बिर्लांना लता मंगेशकर पुरस्कार

फॉर ऑटिझम या सामाजिक संस्थेलाही सन्मानित करण्यात येणार आहे. अभिनेते सचिन पिळगावकर, शरद पोंक्षे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, श्रद्धा कपूर यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने या पुरस्काराचे आयोजन करण्यात येते.दीनानाथ मंगेशकर पुरस्कार जाहीर झालेल्यांमध्ये लता मंगेशकर पुरस्कार - पद्मविभूषण कुमार मंगलम बिर्ला, दीनानाथ मंगेशकर पुरस्कार- अभिनेत्री श्रद्धा कपूर, वायोलिनिस्ट एन.राजम, ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकर, अभिनेता शरद पोंक्षे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, गायिका रीवा राठोड यांचा समावेश आहे. दीनानाथ मंगेशकर जयंती म्हणजेच २४ एप्रिल रोजी पार्ल्यातील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवतांच्या हस्ते मंगेशकर पुरस्कार दिला जाईल.

### गुन्ह्यातील साठ हजारांचे दागिने केले जप्त

त्याच्याकडून आणखी माहिती घेत दहिवद परिसरातून चोरीच्या दागिन्यांपैकी ६० हजार ४५६ रुपये किंमतीचे दागिने हस्तगत केले. उपनिरीक्षक हेमंत खैरनार तपास करीत आहेत. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनिल गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक किशोरकुमार परदेशी, उपनिरीक्षक हेमंत खैरनार, शोध पथकाचे हवालदार राजेंद्र रोकडे, रवींद्र आखडमल, योगेश दाभाडे, विनोद आखडमल, गोविंद कोळी, मनोज दाभाडे, भटू साळुंके, प्रशांत पवार, सचिन वाघ, मनोज महाजन, आरीफ तडवी, सोमा ठाकरे, उमेश पवार, नासीर पठान, मिथून पवार, राम भिल यांनी ही कारवाई केली.

### निलगिरीचे झाड कापण्यातून एकाचा खून

मारहाण करुन गुलदारसिंग पाडवी यांना जीवे ठार केले. तसेच कुटुंबियांना जीवेठार मारण्याची धमकी देवून शिवीगाळ केली. याबाबत शंकर गुलदारसिंग पाडवी यांनी मोलगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक विश्वास पावरा करीत आहेत.

### साक्री तालुका माध्य.शिक्षक पतपेढी

दयाराम शिंदे हे सूचक होते. एक एकच नामांकन पत्र दाखल असल्याने निवड बिनविरोध झाली.

चेअरमन म्हणून सुनील क्षीरसागर व व्हा.चेअरमन पदी कुणाल गांगुर्डे यांचे बिनविरोध निवड होताच पतपेढीत संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या विशेष सभेत माध्यमिक शिक्षकांचे पतपेढीचे मावळते चेअरमन डी.व्ही. सूर्यवंशी, अनिल भदाणे, सर्व सभासद बंधू व मावळते संचालक मंडळ तसेच माध्यमिक शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. चेअरमन व व्हाईस चेअरमन यांच्या निवडीबद्दल सुरेंद्रराव मराठे, जगदीश वाघ, माजी प्रभारी सरपंच सुभाष नहिरे, बंडू गवळी, गोविंद पाटील सोनवणे, विजयराव सोनवणे, कमलाकर क्षीरसागर ,राजेंद्र गवळी, धर्मा घरटे, कैलास पाटील सताळे, घोडदे येथील सर्व माध्यमिक शिक्षक ग्रामस्थ यांनी कौतुक केले आहे.

### कार्यक्षम जिल्हाध्यक्ष देण्याची मागणी

त्यांनी दिले. जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष पाटील यांनी जिल्ह्यात काँग्रेसची परिस्थिती चांगली असली तरी कार्यकर्त्यांना वरिष्ठ पातळीवरून ताकद देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. ज्येष्ठ नेते राजेंद्र गावित म्हणाले की, विधानसभेच्या पराभवाने कार्यकर्त्यांनी खचून न जाता खंबीरपणे उभे राहा आम्ही सर्वजण तुमच्या पाठीशी आहोत. तुमच्या ताकदीवरच पक्ष जिवंत असून आगामी काळात पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी केले. सुहास नाईक यांनी आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने जिल्ह्यात काँग्रेसला प्रभारी ऐवजी कार्यकर्त्यांना संघटित करणारा कार्यक्षम जिल्हाध्यक्ष देण्याची मागणी केली. प्रास्ताविक डॉ.सुरेश नाईक यांनी तर सूत्रसंचालन राजेंद्र पाटील यांनी केले. यावेळी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी व आजी-माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य व पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते.

### महिलांसाठी जनजागृती शिबीर

आशाबाई भिल, ग्रा.पं. सदस्य संगिता गोपाळ, ग्रा. पं. सदस्य विजय पावरा, ग्रा.पं. सदस्य हिरालाल पावरा उपस्थित होते. यावेळी सुळे गावासह परिसरातील असंख्य महिला, मुली तसेच योगेश्वर माळी, सानिया भसिन, अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशन टीम उपस्थित होते.माजी जिल्हा परिषद सदस्य सौ. बेबीताई पावरा यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रमुख वक्त्या ॲड.सौ.गायत्री राठोड यांचे मकौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षणफ या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानात महिला व मुलींना मार्गदर्शन करतांना कौटुंबिक, सामाजिक हिंसाचारापासून कसा बचाव करावा याबाबत अनेक मुद्द्याना स्पर्श करुन आपल्या जीवनात सक्षम होण्याचे आवाहन केले.प्रास्ताविक व सूत्रसंचालन योगेश्वर माळी यांनी तर आभार प्रदर्शन सानिया भसिन यांनी केले.

## धुळ्यात २१ एप्रिलला प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ भरती मेळाव्याचे आयोजन

**धुळे, दि.१६- इतिहासाचार्य राजवाडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (आयटीआय) देवपूर, धुळे येथे मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राद्वारे सोमवार २१ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां) आर.पी.पगारे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

या मेळाव्यात शिकाऊ उमेदवारांची भरती करण्यासाठी धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील शासकीय, अशासकीय आणि औद्योगिक कंपन्याचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. तरी आयटीआय उत्तीर्ण, अनुत्तीर्ण असलेल्या तसेच एम.सी.व्ही.सी उत्तीर्ण, अनुत्तीर्ण, दहावी, बारावी उत्तीर्ण, अनुत्तीर्ण आणि पदविका व पदवीधारक उमेदवारांनी या भरती मेळाव्याचा लाभ घ्यावा. धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिकाऊ उमेदवारांनी या रोजगार मेळाव्यास २१ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता इतिहासाचार्य राजवाडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (आयटीआय) देवपूर, धुळे येथे शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्रांसह उपस्थित रहावे. असे आवाहन इतिहासाचार्य राजवाडे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या अपर्णा कुलकर्णी ,जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, धुळे योगेश पाटील, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,नंदुरबार आणि सहायक प्रशिक्षण सल्लागार (तां) बीटीआर,धुळे आर.पी.पगारे यांनी केले आहे.

## पान १ वरुन

### मुस्लिमांना हिंदू धर्माच्या संस्थेवर

केले. वक्फ मालमत्तेचे वाद सोडविण्याचा निर्णय न्यायालयात का होऊ शकत नाही? यावर तुषार मेहता यांनी सांगितले की, वक्फ संपत्तीची नोंदणी करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना मिळाले आहेत. याआधीही वक्फची नोंदणी करण्याची तरतूद होतीच.

### उपनिरीक्षक कासले आत्मसमर्पण करणार

पोलिसांना शरण जाणार असल्याचं एका व्हिडिओच्या माध्यमातून सांगितलं आहे. मात्र तो पोलिसांना कधी शरण जाईल हे अद्याप त्याने स्पष्ट केले नाही. व्हिडीओत रणजीत कासले सांगत आहे की, मी कालपासून काही कमेंट वाचल्या. काही पत्रकार मित्र, वकील पोलीस अधिकारी यांच्याशी संवाद साधला. त्यावरुन मला जाणवलं की, पळून उपयोग होणार नाही. कोणत्याही संकटाचा मी सामना केला आहे. त्यानुसार मी या संकटाचा सामना करणार आहे. मी बीड पोलिसांसमोर आत्मसमर्पण करण्याचा निर्णय घेतला आहे. सिस्टीमविरोधात जास्त दिवस लढता येत नाही हे मला जाणवले आहे. माझे दोन्ही मोबाईल चालू करणार आहे. मला फोन करुन, त्रास देऊ नका. मला मेसेज करा. मी ज्यांच्यावर आरोप केले तेच भाजपात प्रवेश करणार आहे. धनंजय मुंडे आता वॉशिंग मशीनमध्ये क्लीन होऊन बाहेर येणार आहे. यात फक्त माझा बळी जाणार हे माहिती आहे. त्यामुळे मी जे काही होईल त्याला सामोरे जाणार असून, बीड पोलिसांसमोर हजर होणार आहे. त्यांनी मला पकडले तरी काही हरकत नाही. हजर होऊन लढाई लढतच राहणार. सर्व आरोप सिद्ध करुन दाखवणार, असे कासले याने म्हटले आहे.

### नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार उत्साहात

परिसरातील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी नवनिर्वाचित आमदारांना माजी सरपंच चुनीलाल पाटील यांनी साकडे घातले. विकास कामांसाठी वरीष्ठ पातळीवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन उपस्थित मान्यवरांनी दिले.

कार्यक्रमाप्रसंगी गावातील ज्येष्ठ नेता सजन पाटील, शालिग्राम पाटील, मुकुंदा पाटील, डॉ.विष्णु मोरे, मनोहर पाटील, डॉ.प्रविण साळुंके, लखिचंद पाटील, रमेश साळुंके, एम.डी.पाटील, आबाजी भामरे, धनराज साळुंके, शिवाजी शिंदे, अरूण भामरे, सुनिल बोरसे, प्रविण मोरे, किशोर मोरे, प्रेमचंद जैन, अरूण मोरे, दिलीप साळुंके, राजेंद्र पाटील, भगवान साळुंके, भालेराव साळेंके, शांताराम शिंदे, विजय भामरे, दशरथ वैराळे, महेंद्र साळुंके, निलेश सोनवणे, कुंदन साळुंके उपस्थित होते.

### आजी, माजी सैनिकांची तालुकास्तरावर बैठक

बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि.२३ एप्रिल रोजी तहसिल कार्यालय, साक्री येथे सकाळी ११ वाजता तसेच गुरुवार, दि.२४ एप्रिल रोजी तहसिल कार्यालय, शिरपूर येथे सकाळी ११ वाजता व दुपारी ३ वाजता तहसिल कार्यालय, शिंदखेडा येथे बैठक आयोजित केली आहे. तरी तालुक्यातील सर्व आजी/माजी सैनिकांनी त्यांच्या तालुकापातळीवरील अडीअडचणी आपल्या तालुक्याच्या ठिकाणी तहसिलदार कार्यालयामध्ये आपल्या विनंती, तक्रारी अर्जाच्या दोन प्रतीसह सादर करुन वरील तारखेस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

### लामकानी रस्त्यावर अपघात; दाम्पत्य ठार

धुळे- तालुक्यातील चिंचवार ते लामकानी रस्त्यावर बोलेरो आणि क्रुझर या वाहनांमध्ये अपघात अपघात झाला. या अपघातात दाम्पत्याचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाला. एकनाथ मणिलाल जयस्वाल यांनी दि.१४ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, नंदुरबार जिल्हा, नवापूर तालुका चिंचपाडा बाजार चौक येथील रहिवासी मणिलाल रामलाल जयस्वाल (वय ७०) व शोभा मणिलाल जयस्वाल (वय ७०) हे दाम्पत्य धुळे तालुक्यातील गोंदुर येथून लग्न सोहळा आटोपून क्रुझर गाडी क्र. एमएच१८/एजे-४४६९ मध्ये बसून शहादा येथे जात असतांना समोरून येणारे बोलेरो वाहन क्र.एमएच ४६/-३७३३ ने जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात मणिलाल जयस्वाल व शोभाबाई जयस्वाल हे दाम्पत्य ठार झाल तर इतर प्रवासी जखमी झाले.



## शिरपूरमधील आर.सी.पटेल महाविद्यालयात वाणिज्य विभागाचे भित्तिपत्रक प्रदर्शन उत्साहात

**शिरपूर, दि.१६- येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने भित्तिपत्रक प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले.**

या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेसाठी नवे दालन खुले झाले. या उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.ए.एम. पाटील व उपप्राचार्य आर.डी. जाधव यांच्या हस्ते झाले. वाणिज्य विभागप्रमुख डॉ.शूभागी पिंगळे, परीक्षक म्हणून डॉ.राजू पवार आणि डॉ.रमाकांत चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन प्रा.शबनम पिंजारी यांनी केले. विद्यार्थ्यांनी वित्तीय, विपणन, बँकिंग, ऑडिटिंग, महिलांचे योगदान, माहिती व तंत्रज्ञान आदी विषयांवर भित्तिपत्रक सादर केले. एकूण विद्यार्थ्यांनी यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, सादरीकरण कौशल्याचे परीक्षकांनी कौतुक केले आणि विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आले.

स्पर्धेत प्रथम क्रमांक यश महाजन व वसावे दिनकर, द्वितीय क्रमांक भूषण पाटील, विनीत पाटील, हर्ष गुप्ता, तृतीय क्रमांक शितल चौधरी, सक्केहल सोनावणे, आरती पवार या विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.प्रतिमा श्रावगी, प्रा.पियुष सोनार, प्रा.कामिनी चौधरी यांचे विशेष सहकार्य लाभले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीचा व सादरीकरण कौशल्याचा विकास झाला असून भविष्यातील व्यवसायिक आणि तांत्रिक क्षेत्रातील आव्हानांसाठी त्यांना आत्मविश्वास मिळाला, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## दादासाहेब भामरे विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**शहादा, दि.१६ (प्रतिनिधी)- धुळे येथील राष्ट्रमाता जिजाऊ सेवाभावी संस्था संचलित कै.दादासाहेब बी.एस. भामरे विद्यालय शहादा येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.**




या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक पी.यु.ठाकरे यांच्या सह शिक्षकांनी प्रतिमा पूजन करून अभिवादन केले. यावेळी मुख्याध्यापक ठाकरे, श्रीमती श्रद्धा बैसाणे व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डी.ए.पाटील यांनी केले तर आभार प्रदीप पाटील यांनी मानलेत. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

**पाहिजेत**
* दुकान कामाकरिता अनुभवी हुशार माणूस- २
* अकौंन्ट कामाकरिता लेडीज/जेन्टस्- १
-: संपर्क :-
9850815243
7588517770

**पाहिजेत**
हुशार व अनुभवी मॅनेजर – २ जागा
मार्केटींग – २ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर–२
हेल्पर – ४ जागा
-: संपर्क :-
क्रिष्णा फोम अँड फर्निशिंग
अवधान, धुळे
9820918218
9637531111

**बेसणु**



स्व.कोकिलाबेन कनुभाई पटेल
गुरुवार, १७–०४–२०२५ को
शाम ५:०० से ६:३० बजे बेसणु
१०५, कुंकुसदन, मालेगावरोड, अग्रवाल नगर, धुळे
-------: शोकाकुल:-------
गौतम कनुभाई पटेल
भूमेश कनुभाई पटेल
समस्त पटेल परिवार

**पाहिजेत**
दुकान कामासाठी हुशार इमानदार काम करणारी मुले लावणे आहे. समक्ष भेटा!
श्री सत्यनारायण ड्रेसेस
जैन मंदिराजवळ, ग.नं.२, धुळे
9423344965

**पाहिजेत**
ऑफिस करिता अनुभवी अकौन्टंट व टॅलीचे ज्ञान आवश्यक.
समक्ष भेटा!
-: संपर्क :-
9823178279

शहरातील सर्वात कमी दरात नामवंत कंपनीचे हॅण्डलूम विकणारे एकमेव दुकान
प्रोप्रा.पप्पु बर्वे
8888319125, 9172439125
प्रतिक हॅण्डलुम
सोफा | बेड बॅक | वॉलपेपर | चेअर कुशन | फोल्डींग गादी | सोफा कुशन



आमच्याकडे सर्व प्रकारचे गादी, सोफे, परदे, कारपेट, वॉलपेपर व कुशनसेट, कबुतर जाळी, चेअर कुशन, फोल्डींग गादी, बनवून मिळेल तसेच मटेरियल मिळेल.
♦उत्तरमुखी मारुती मंदिर चौक जवळ, वाडीभोकर रोड, देवपूर धुळे♦
सर्व्हिस फ्री, हिरवा शेडींग नेट कापड!

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर– जेन्टस्/लेडीज,
दुकानासाठी सेल्समन– जेन्टस्/लेडीज
साफसफाईसाठी– जेन्टस्/लेडीज
-: संपर्क :-
8698640400

**पाहिजे**
ऑफिस कामासाठी लेडीज पाहिजे. फोन करण्यासाठी स्वत: भेटा!
कामाची वेळ : १० ते ६
आशुतोष सर्जिकल
गल्ली नं.५, सोन्या मारुती समोर, धुळे
9822752160

**पाहिजेत**
पाण्याचे जार वाटपसाठी माणसे पाहिजेत.
आकर्षक पगार मिळेल.
समक्ष भेटा!
बुऱ्हानी आईस फॅक्टरी
यल्लमा देवी मंदिरासमोर, मालेगावरोड, धुळे
8208755681

**विकणे आहे**
धुळे शहराच्या मध्यवर्ती असलेली 63x16 जागा त्वरित विकणे आहे. जागा घेणाऱ्यास ४४० स्क्वे.फूट जागा मोफत मिळेल.
-: संपर्क :-
7744010511
8888269758

**कार्टून पुठ्ठा रु.१६.०० प्रति किलो बंडल**
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड
भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**मुले पाहिजेत**
कुंडाणे (वार) साक्रीरोड व लळींग येथील पेट्रोल पंपासाठी अनुभवी मुले पाहिजेत तसेच हवा भरण्यासाठी अनुभवी मुले पाहिजेत.
-: संपर्क :-
9822107518

**पाहिजे**
किचन कामाकरीता
पुर्ण दिवस/अर्धा दिवस
बाई – १
वेटर/हेल्पर – २
B'Live Restaurant
ग.नं.५, सोन्या मारुती जवळ,धुळे
संपर्क – ९४२३९७८८८७

**पाहिजेत**
मार्केटिंग / वसुली प्रतिनिधी - 2
पदवीधर व मोटार सायकल आवश्यक
ऑफीस बॉय - 1
10 वी पास, सायकल आवश्यक
अर्जासह भेटा
सकाळी ११ ते संध्या. ७ पर्यंत
एके मीडिया
पहिला मजला, सत्यम आर्केड, पतंजलीसमोर, नगरपट्टी, धुळे. मो.: 98811 36034

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर लावणे आहे.
जनरल कामासाठी मुलगा लावणे आहे.
-: संपर्क :-
9822818015
7972768488

**पाहिजेत**
रेडिमेड शोरुमसाठी (किडस् वेअर)
सेल्सगर्ल–२
सेल्समन– १
प्रत्यक्ष भेटा!
रॉयल मेन्स वेअर अँड बबल्स किडस् अँड टॉईज
आग्रारोड, धुळे
9423916107

**शेतकरी माल खरेदी**
शेतकरी गहू, मका, ज्वारी व इतर शेतकरी माल कोणत्याही खर्चाशिवाय MIDC धुळे येथे खरेदी सुरु आहे.
-: संपर्क :-
9423978963

Godrej
२५ वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट आणि वाढीव वॉरंटी...
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे–४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा–२५६९३९, मालेगाव–२४३१३३६, नाशिक–२५७५९८९, पुणे–४००४११५, आपला महाराष्ट्र–रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०